**रे.दि.मु.नं.८८/२०१७**

**नि.१८ ची पुरवणी**

**शपथेवर पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ पी.व्ही.चव्हाण यांचेतर्फे पुढे सुरु :—**

७. मी माझे शपथपत्रातील मजकुर वाचून पाहिलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यावर मी सही केलेली आहे. शपथपत्रास यापूर्वी नि.१८ दिलेली आहे.

**शपथेवर उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.के.शिंदे यांचेतर्फे पुढे सुरु :—**

८. प्रतिवादी हे माझे बहिणीचे पती आहेत. त्यांना मुलगा नाही. त्यांना एकच मुलगी आहे. प्रतिवादी हे त्यांच्या पुतण्याजवळ राहातात याची मला माहिती नाही. प्रतिवादी व त्यांची मुलगी यांच्या दरम्यान दावे सुरु आहेत याची मला माहिती नाही. मी व माझे भावांनी प्रतिवादीच्याविरुद्ध त्याच्या मुलीने दाखल केलेल्या दाव्यात मुलीच्या बाजुने प्रतिज्ञापत्र दाखल केले होते हे मला आठवत नाही. प्रतिवादी व त्याची मुलगी यांच्यामध्ये वाद आहेत याची मला माहिती नाही. प्रतिवादीची मुलगी कोठे राहाते याची मला माहिती नाही. प्रतिवादीची पत्नी म्हणजेच माझी बहिण मयत झाली आहे. तिच्या अंत्यविधीच्यावेळी मी हजर नव्हतो. आमच्या कुटुंबातील कोण गेले होते हे मला सांगता येत नाही. प्रतिवादीच्या पत्नीच्या मृत्यूनंतर मी प्रतिवादीस भेटण्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादीच्या मुलीच्या मनात प्रतिवादीच्या मिळकतीविषयी लालसा उत्पन्न झाल्यामुळे आम्ही त्याच्याविरुध्द वेगवेगळे दावे दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या मुलीला प्रतिवादीविरुध्द फितवण्याचे काम मी व माझे भाउ करीत आहोत. प्रतिवादीला मी मागील बरेच वर्षे भेटलेलो नाही. प्रतिवादी हे मुंबई येथे असताना मी त्यांना भेटलो होतो. सन १९८५ मध्ये त्यांनी मुंबई सोडली याची मला माहिती नाही.

९. वाद मिळकत ही मुळची कुळहक्काची होती. त्या जमीनीमध्ये कृष्णा कुदळे व रामचंद्र कुदळे हे दोघे हक्कदार होते. रामचंद्र हे कामानिमित्त मुंबई येथे

होते याबद्दल मला सांगता येणार नाही. माझे वडील मुंबई येथे कारखान्यात काम करीत होते. ते मुंबई येथे असताना मयत झाले. कृष्णा हे शेती करीत होते याची मला माहिती नाही. कृष्णा यास मुलबाळ नव्हते. माझे वडील सन १९७६ – १९७७ मध्ये मयत झाले. माझे वडीलांच्या मृत्यूनंतर कृष्णा मयत झाले याबद्दल मला सांगता येणार नाही. ते कोणत्या वर्षी मयत झाले याबाबत मी माहिती घेतली नाही.

१०. वादमिळकत ही सन १९६२ मध्ये प्रतिवादी याच्या नावे लागली याची मला माहिती नाही. वादमिळकत ही प्रतिवादीच्या नावे कशाप्रकारे लागली याची माहिती मी घेतलेली नाही. माझे वडील रामचंद्र व चुलते कृष्णा यांनी वादमिळकतीबाबत प्रतिवादीविरुध्द कोणती कारवाई केली होती काय याबाबत मला सांगता येत नाही. त्या कारवाईबाबत कागदपत्रांचा अथवा वस्तुस्थितीचा मी शोध घेतलेला नाही. माझे पाहाण्यात तसे कोणतेही कागद आलेले नाहीत. वडीलांच्या मृत्यूनंतर मी प्रतिवादीस दावा मिळकत आमच्या नावावर करुन दया असे म्हणाला होतो. तथापि त्यांनी तशाप्रकारे जमीन आमच्या नावावर करुन दिलेली नाही. सदरची जमीन आमच्या मालकीची असुन ती प्रतिवादीने चुकीने त्याच्या नावावर करुन घेतलेली आहे असे म्हणून आम्ही स्वत :हून कोणताही दावा दाखल केलेला नव्हता. वडीलांच्या मृत्यूनंतर ते सन २००५ पर्यंत आम्ही महसूल न्यायालयात कोणतीही कारवाई केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही एकत्रीकरण अधिकारी व अपिल अधिकारी पुणे आणि सातारा यांच्यापुढे केलेल्या कारवाईमध्ये प्रतिवादी हजर झालेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे माझे नातलग अधिकारी असल्यामुळे आम्ही मुळ अभिलेखात फेरफार केले.

११. मला चार बहिणी आहेत व दोन भाउ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तिघेही मुंबई येथे नोकरीस होतो. मी मुंबई येथे नोकरीस होतो. सेवानिवृत्तीनंतर मी माझे गावी आलो. माझे तीन बहिणी मयत झाल्या असून एक बहिण हयात आहे. प्रतिवादीची पत्नी अंदाजे एक वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत याची मला माहिती नाही. दावा दाखल करतेवेळेस ती हयात होती. सदरचा दावा दाखल करणेपूर्वी मी प्रतिवादीच्या पत्नीला विचारले होते.

त्याचप्रमाणे माझे इतर बहिणींना विचारले होते. मयत बहिणींच्या वारसांना विचारले नव्हते. हयात बहिणींना प्रतिवादीविरुध्द वाद जमिनीबाबत दावा दाखल करुया असे मी विचारले होते. बहिणींना या दाव्यात वादी म्हणून सामिल करण्यासाठी मला कोणतीही अडचण नव्हती. त्यांना अथवा मयत बहिणींच्या वारसांना या दाव्यात का सामिल केले नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. माझे वडील व चुलते हे माझे सर्व बहिणीकडे त्यांच्या हयातीत ये — जा करीत होते याची मला माहिती नाही. माझे वडीलांचे व चुलत्यांचे माझे बहिणींशी अथवा त्यांच्या कुटुंबियांशी कोणतेही वाद नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे भाउ स्वतंत्र राहातो. साक्षीदार सांगतात की, जेवणापुरते वेगळे राहातो. माझे बहिणींनी, इतर भावांनी अथवा मयत बहिणींच्या वारसांनी दावाजमिनीबाबत मला मुखत्यारपत्र लिहून दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी आमच्याविरुध्द रे.दि.मु.नं.३६३/२००६ हा दाखल केल्यानंतर आम्ही सातबारा उता—याला नावे लावून घेतली. सन १९६५ पासून ते सन २००५ पर्यंत दावाजमिनीच्या सातबारा उता—यास प्रतिवादी याच्या नावाची नोंद मालकसदरी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या नोंदीमध्ये आम्ही बदल केल्यामुळे प्रतिवादींनी दावा दाखल केला होता. आम्हाला कृष्णा यांनी दावा मिळकतीबाबत कोणताही लेखी दस्त करुन दिलेला नाही. दावा मिळकत ही माझे वडील रामचंद्र यांच्या एकटयाच्या मालकीची नव्हती. त्या जमीनीत वडीलांचा अर्धा हिस्सा होता. सन १९७६ पासून सन २००५ पर्यंत आम्ही प्रतिवादींना जमीन बरेचवेळा परत मागितलेली होती. तथापी त्यांनी जमीन परत दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ज्या ज्या वेळी विचारले त्यावेळेस प्रतिवादी त्या मिळकतीवर स्वतःची मालकी सांगत होते. आम्ही सन १९७६ पासून जमीन मागुनही प्रतिवादी देत नव्हते त्याचे कारण मी त्यांना विचारले नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, सन २००५ पर्यंत दावाजमिन ही बागायत होती. सन २००५ पुर्वीपासून प्रतिवादी यांनी सदर जमीनीमध्ये कॅनॉलद्वारे व विहीरीतून पाणी घेवून बागायती पिके घेतलेली होती याची मला माहिती नाही. प्रतिवादींनी घेतलेल्या पिकांबाबत आमच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. वादमिळकतीमध्ये असलेल्या कृष्णा याचा हक्क आम्हाला प्राप्त होतो याबाबत

आम्ही कोणताही दावा दाखल केलेला नाही. कृष्णा व त्याची पत्नी गावाकडे वेगळे राहात होते.

(प्रतिवादींच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.)

**श्रवणोत्तर स्विकृत./समक्ष**

**वाई** **(डी.आर.माळी)**
**दि. १३/०९/२०१९** **२ रे सह.दि.न्या.क.स्तर, वाई**